"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

जा.क्र.मनपा/आस्था/ 2963 /2025-26 दि. 12 /03 /2026

## परिपत्रक

विषय :- गोपनीय अहवाल व मत्ता दायित्व प्रपत्र जमा करणेबाबत.

संदर्भ :- 1. शासन निर्णय क्रमांक-वशिअ-1214/प्र.क्र.26/11, दि.02 जून, 2014.
2. शासन निर्णय क्र.सीएफआर-1211/प्र.क्र.257/तेरा, दि.07, फेब्रुवारी, 2018.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी (वर्ग-01 ते वर्ग-03) यांनी सन 2025-26 चे गोपनीय अहवाल व मत्ता दायित्व प्रपत्र सादर करणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी त्यांचे व त्यांच्या अधिनस्त कार्यरत कर्मचाऱ्यांचे सन 2025-26 चे गोपनीय अहवाल व मत्ता दायित्व प्रपत्र आस्थापना विभागात दि.31/05/2026 रोजी पर्यंत जमा करावे.

संदर्भ क्र.01 च्या शासन निर्णयातील नमुद निर्देशानुसार ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल व मत्ता दायित्व प्रपत्र आस्थापना विभागात सादर केले जाणार नाहीत, त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 मधील 5(1)(चार) मधील तरतुदीनुसार वेतनवाढ रोखण्यात येईल, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख

/- सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व (वर्ग-1 ते वर्ग-3) अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्देशनास आणुन दयावे.